## <u>नि.दि.मु.क्र.०९/२००९ मधील निशाणी क्र.१६५ वरील आदेश</u>
## <u>(CNR No. MHSI080000972009)</u>

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ रजनी देवू भोसले उर्फ रजनी सदाशिव धामापुरकर त्यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.०९ यांचे नाव शासकीय अभिलेखामध्ये सुचिता सदानंद धामापुरकर असे नाव आहे. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.०९ ह्या दि.०९/१२/२०१६ रोजी मयत झाल्या आहेत. सबब, प्रस्तूत वादी यांनी प्रतिवादी क्र.०९ चे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र.९ यांचे वारस अभिलेखावर आणणेस जाणीवपूर्वक विलंब केलेला आहे. सदर विलंब ६ वर्षे ६ महिने १२ दिवसांचा इतका आहे. प्रस्तूत केस सुनावणीला आल्यानंतर वादी यांनी प्रतिवादी क्र.९ चे वारस अभिलेखावर आणलेले आहेत. वादी हे प्रतिवादी यांना केवळ मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक विलंब करत आहेत हे दिसून येते. तसेच, अर्जात नमुद वारसांव्यतिरीक्त प्रतिवादी क्र.०९ यांना एक मुलगी देखील आहे. वादी यांनी जाणीवपूर्वक सदर वारस रेकॉर्डवर आणलेला नाही. त्यामुळे, अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर अर्ज मंजूर करणेचे झाल्यास प्रतिवादीस रक्कम रु.१,०००/- इतका खर्च देववण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३.  प्रस्तूत दावा वाटप व पृथ्थक कब्जाकरीता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.०९ चे वारस हे प्रस्तूत दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. अर्जात नमूद कारण योग्य वाटते. सबब, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**–आदेश –**

०१. निशाणी क्र.१६५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी

०३. वादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी नियमाप्रमाणे दावा दुरूस्ती प्रत देखील दाखल करावी.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2024.04.03 17:47:28 +0530

स्थळ : कणकवली  (टी.एच.शेख)

दिनांक : ०३/०४/२०२४  दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.